VERY URGENT

DSW

UNIVERSITY OF MUMBAI
IS/(ID/ECD/20...
28 FEB 2014
50101

महाराष्ट्र शासन
क्र.मआवि २०१३/प्र.क्र.२४५/१३/शिक्षण १
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकूल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक : १४/०२/२०१४

P.A FOR

3765
3/3/14

प्रति,

कुलगुरु/कुलसचिव,
सर्व कृषी/अकृषी विद्यापीठे

**विषय:-** थॅलेसेमिया या रोगाचा प्रसार रोखण्याकरिता महाविद्यालयीन विद्यर्थ्यांचे समुपदेशन करणे व तपासणीकरीता प्रोत्साहित करण्याची कार्यवाही करणेबाबत......

महोदय,

मा.राज्यपाल यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०३/०९/२०१३ रोजी संयुक्त कुलगुरु मंडळाची बैठक घेण्यात आली.

२. सदर बैठकीत थॅलेसेमिया या विकाराचा प्रसार रोखण्याकरिता, विद्यापीठ स्तरावरुन तरुण वर्गात जागृती निर्माण करण्याकरिता आवश्यक उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

३. थॅलेसेमिया हा अनुवंशिक विकार असून थॅलेसेमिया असलेल्या व्यक्तीचा अन्य थॅलेसेमियाग्रस्त व्यक्तींशी विवाह झाल्यास होणाऱ्या अपत्यांनाही थॅलेसेमिया होतो. थॅलेसेमिया मेजर असणाऱ्या व्यक्तीला ठराविक कालावधीनंतर बाहेरुन रक्त द्यावे लागते. थॅलेसेमिया असणाऱ्या व्यक्तींनी परस्पराशी विवाह केला तर पुढील पिढी थॅलेसेमिया ग्रस्त जन्माला येण्याची शक्यता जास्तीत जास्त असते. याकरिता तरुण वर्गात जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. यास्तव महाविद्यालयातील तरुणांची थॅलेसेमियाकरिता तपासणी करणे उचित ठरेल.

४. यास्तव विद्यापीठ स्तरावरुन संलग्न महाविद्यालयांमध्ये थॅलेसेमिया या विकाराचा प्रसार रोखण्याकरिता आवश्यक जागृती अभियान राबविण्यात यावे. थॅलेसेमिया विकाराची तपासणी करण्याकरिता विद्यार्थ्यांचे प्रबोधन करुन रक्त तपासणी करण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात यावी. सदर तपासणीकरिता महाविद्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणा-या सामान्य रुग्णालयात / शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न रूग्णालयामध्ये विद्यार्थ्यांची रक्त चाचणी करण्यात यावी.

आपली,

( अं.वि.अंभिरे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

Dr DSW

R
01/03/14